नियमीत दरखास्त क्र.१५/२०१६
ताई खंगार विरूध्द अशोक भोकसे

निशाणी क्र. ३५ वरील आदेश
(दि.०७.०७.२०२५)

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी अशोक यांनी भुतलक्षी प्रभावाने वादीचा अर्ज रद्द करण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ प्रमाणे दाखल केला आहे. दरखाास्तदार यांनी प्रस्तूत अर्जास निशाणी ४० कडे म्हणणे दाखल केले.

२. प्रतिवादीतर्फे वकील श्री. हुमणे व वादीतर्फे वकील श्री. कुशवहा यांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रतिवादीतर्फे वकील श्री. हुमणे यांनी असा युक्तीवाद केला की वादीने न्यायालयाची फसवणुक करून वादातील आदेश म्हणजे दिवाणी दावा क्र.७४/२००४ मधील न्यायलयीन निर्णय प्राप्त करूण घेतला आहे. तसेच या प्रकरणातील आदेश खोटया व चुकीच्या माहितीच्या आधारे प्राप्त करून घेतला आहे. कोर्टाने पारीत केलेला दिवाणी दावा क्र.७४/२००४ मधील न्याय निर्णय हा खोटया व चुकीच्या माहितीच्या आधारे पारीत केला असून वादीने त्या दाव्यामध्ये इतर कोणाचीही साक्ष घेतलेली नाही. तिने प्रतीवादीच्या मालकीच्या घरी भाडेकरू म्हणून राहत होती हे शाबीत करण्यासाठी कोणताही दसरा पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे वादीच्या हक्कात झालेला न्यायनिर्णय हा चुकीचा असून तो अंमलबजावणीसाठी पात्र नाही. सदरचा आदेश रद्द करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादीचा सदरचा अर्ज हा मंजूर करून वादीने दाखल केलेली दरखास्त रद्द करण्याची मागणी केलेली आहे.

४. प्रतिवादीतर्फे वकील श्री. कुशवहा यांनी असा युक्तीवाद केला की वादीने दाखल केलेली दरखास्त ही नियमीत दिवाणी दावा क्र.६५/११ ज्याचा जुना क्र.७१/२००९ मधील दि.३०.०६.२०१६ रोजी पारीत केलेल्या न्यायनिर्णयाच्या आधारे दाखल केला आहे. प्रतिवादी कथन करत असलेल्या नियमित दिवाणी दावा क्र. ७४/२००४ च्या दाव्यामध्ये प्रतिवादीने वादीच्या कब्जा वहीवाटीला हरकत अडथळा करू नये याकरीता न्यायालयाने

मनाईचा आदेश दि.११.०९.२००६ रोजी पारीत केला होता.

५. वादीतर्फे वकील श्री. कुशवहा यांनी पुढे असा युक्तीवाद केला की या प्रतिवादीने माननीय जिल्हा न्यायाधीश नागपूर यांच्यासमोर नियमीत दिवाणी दावा क्र.६५/२०११ च्या न्यायनिर्णयाच्या विरोधात अपील दाखल करण्याकरीता झालेल्या ९४६ दिवसांचा विलंब माफ करण्यासाठी विलंब माफीचा अर्ज किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४०/२०१७ चा दाखल केला होता. त्या अर्जावर दि. १९.०४.२०१७ रोजी आदेश पारीत करून माननीय जिल्हा न्यायाधीश- १६, नागपूर यांनी प्रतिवादीने अतिमहत्त्वाची तथ्ये न्यायालयापासून लपवून ठेवल्याने अर्ज नामंजूर केला. या आदेशाच्या विरोधात प्रतिवादीने माननीय उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडे रिट पिटीशन स्टॅम्प नं.१२५७०/२०१७ चा दाखल केला होता. सदरचा अर्ज दि.३१.०७.२०१७ रोजी माननीय उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी नामंजूर केला. त्यामुळे प्रतिवादीने जाणुनबुजून अश्या खोटया मजकूराचा अर्ज दाखल केला आहे. वादीचे वकील श्री. कुशवहा यांनी पुढे असा युक्तीवाद केला की प्रतिवादी केवळ दरखास्तीचे प्रकरण लांबविण्याचा प्रयत्न करत आहे व त्यामुळेच प्रतिवादीने अश्या स्वरूपाचा अर्ज दाखल केला आहे. तो खर्चासह नामंजूर करण्यात यावा. वादीतर्फे वकील श्री. कुशवहा यानी पुढे असा युक्तीवाद केला की दरखास्तीचे प्रकरण हे नियमीत दिवाणी दावा क्र.७४/२००४ मधील निकालाच्या अनुषंगाने दाखल केलेला नसून नियमीत दिवाणी दावा क्र.६५/२०११ च्या दि.३०.०६.२०१४ च्या निकालाप्रमाणे दाखल केलेला आहे. मात्र प्रतिवादीने नियमीत दिवाणी मुकदमा क्र.७४/२००४ मधील निकाल रद्दबातल करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे. जे या प्रकरणात करता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादीने जाणुनबुजून खोटया माहितीच्या आधारे महत्त्वाची तथ्ये लपवून ठेवून चुकीचा अर्ज दाखल केला असल्याने तो खर्चासह रद्द करावा.

६. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे काळजीपूर्वक अवलोकन केले. तसेच दरखास्त अर्जासोबत जोडलेल्या नियमित मुकदमा नं.६५/२०११ मधील निशाणी २४ चा हुकुमनामा प्रतिवादीने निशाणी ३५ च्या अर्जासोबत जोडलेले ८ कागदपत्रे, तसेच वादीतर्फे निशाणी ३७ च्या यादी सोबत दाखल केलेले माननीय उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील वेबसाईटवरील प्रत, तसेच प्रतिवादीने निशाणी

४२ सोबत दाखल केलेले कागदपत्र व निशाणी १८ सोबत दाखल केलेल्या रिट पिटीशनच्या अर्जाची व मा. जिल्हा न्यायाधीश नागपूर यांचेकडील दि.कि. अर्ज क्र. १४०/२०१७ च्या प्रतीचे काळजीपूर्वक अवलोकन केले.

७. सदरचे प्रकरण वादीने नियमित दिवाणी दावा क्र. ६५/२०११ ज्याचा जुना नियमीत दिवाणी दावा क्र. ७१/२००९ मधील दि. ३०.०६.२०१४ रोजीच्या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी दाखल केला असल्याचे दिसून येते. नियमित दिवाणी दावा क्र.६५/२०११ चा दावा हा वादीने प्रतिवादीविरूध्द दावा मिळकतीचा कब्जा तिला पुन्हा देण्यासाठी दाखल केलेला असल्याचे दिसून येते. त्यामध्ये दि.३०.०६.२०१४ रोजी दावा अंशत: मंजूर करून प्रतिवादीने वादीला दावा मिळकतीचा कब्जा एक महिन्यात परत दयावा असा आदेश केलेला आहे. प्रतिवादीने या प्रकरणी निशाणी १८ सोबत दि.१६.०६.२०१७ रोजी माननीय उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडे दाखल केलेल्या रिट पिटीशनची प्रत दाखल केली आहे. यावरून प्रतिवादीने नियमित दिवाणी दावा क्र.६५/२०११ च्या आदेशाविरोधात विलंब माफीचा अर्ज माननीय जिल्हा न्यायाधीश नागपूर यांच्याकडे दाखल केला होता व तो नामंजूर झाला असल्याचे स्पष्ट दिसून येते. तसेच माननीय जिल्हा न्यायाधीश, नागपूर यांच्या आदेशाच्या विरोधात प्रतिवादीने माननीय उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडे रिट पिटीशन दाखल केले असल्याचे दिसून येते. निशाणी १८/१ कडील माननीय उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर कडे दाखल केलेल्या रिट पिटीशनच्या अर्जामध्ये परिच्छेद क्र.२ मध्ये खालीलप्रमाणे मजकूर नमूद केला आहे.

*“Smt. Tai, the plaintiff in RCS No.74/2004 filed against the present petitioners (‘defendants’ therein) as such relief of injunction restrain from dispossessing her from the suit house and the said suit came to be decreed by the Civil Judge, Junior Division, Kamptee on 11.09.2006 granting an injunction in favour of plaintiff Smt. Tai. The present petitioners (defendants) filed the suit for arrears of rent, but the same was dismissed on 17.07.2009.”*

८. या कथनांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता प्रतिवादीला माननीय उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल करतेवेळी वादीने दाखल केलेल्या नियमित दिवाणी दावा

क्र.७४/२००४ मध्ये वादीला दावा मिळकतीतून बेदखल करू नये म्हणून आदेश पारित झाल्याची पूर्ण माहिती होती असे स्पष्ट दिसून येते. तसेच या प्रकरणात महत्त्वाचे असलेले कथन म्हणजे प्रतिवादीने या वादीच्या विरोधात थकीत भाडे वसूलीसाठी नियमीत दिवाणी दावा दाखल केला होता. मात्र तो दि.१७.०७.२००९ रोजी नामंजूर करण्यात आला होता, असे प्रतिवादीने स्पष्टपणे कबूल केले होते. प्रतिवादीने निशाणी ३५ सोबत नियमीत दिवाणी दावा क्र.७४/२००४ चे दि.११.०९.२००६ रोजीचे निकालाची प्रत अनु. १ कडे दाखल केली आहे. त्यामध्ये माननीय दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कामठी यांनी न्यायनिर्णयाच्या परिच्छेद क्र. ४ पान नं.४ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

*“Defendant has initially denied it in his written statement but later on stated that the monthly rent was Rs.200/- per month and the plaintiff was not paying the rent. Therefore, it is clear that the plaintiff is the tenant of the suit house.”*

९. न्यायनिर्णयामधील या कथनानूसार प्रतिवादीला वाद मिळकतमध्ये वादी भाडेकरू असल्याचे स्पष्टपणे मान्य व कबूल आहे असे दिसून येते. अशी परिस्थीती असूनही तसेच मुळात प्रतिवादीला नियमीत दिवाणी मुकदमा क्र.६५/२०११ मधील न्यायनिर्णय रद्दबातल करता न आल्याने तसेच त्याबाबत दाखल केलेले अर्ज माननीय जिल्हा न्यायाधीश, नागपूर व माननीय उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रद्द केले असल्याने प्रतिवादीने सदरचे प्रकरण प्रलंबित ठेवण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केले असल्याचे स्पष्ट दिसून येते.

१०. या अर्जाद्वारे प्रतिवादीने नियमित दिवाणी मुकदमा क्र.७४/२००४ मधील न्यायनिर्णय रद्दबातल करण्यासाठी विनंती केली आहे. मात्र ७४/२००४ मधील न्यायनिर्णय प्रतिवादीने कोणत्याही कोर्टात आव्हाणीत न केल्याने तो अंतिम झाला आहे. या व्यतिरिक्त अतिशय महत्त्वाची गोष्टी जसे की नियमित दिवाणी दावा क्र.६५/२०११ मधील न्यायनिर्णयाच्या विरोधात दाखल केलेला किरकोळ अर्ज क्र.१४०/२०१७ व तो अर्ज माननीय जिल्हा न्यायाधीश, नागपूर यांनी नामंजूर केल्यानंतर त्याविरूध्द दाखल केलेल्या माननीय उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडील रिट पिटीशन नं.१२५७०/२०१७ मधील प्रकरणे व ते नामंजूर झाल्याबाबत या अर्जात काहीही कथन

केलेले नाही. मुळात प्रतिवादीने दाखल केलेल्या या अर्जामध्ये नियमीत दिवाणी दावा क्र.६५/२०११ ज्याचा जुना क्र.७१/२००९ चा आदेश व हुकुमनामा विरोधात केला आहे असे नमूद केले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज हा मुळात या अर्जातील हुकुमनामा म्हणजे नियमीत मुकदमा क्र.६५/२०११ चा हुकुमनाम्याच्या विरोधात नसल्याचे स्पष्ट होते. याउलट प्रतिवादीने दाखल केलेल्या अर्जामधील मजकुराचे काळजीपुर्व क वाचन केले असता असे स्पष्ट दिसून येते की प्रतिवादीने केवळ हुकुमनामा झाल्यानंतरच्या तथ्याचा आधार घेउन सदरचा अर्ज दाखल केला आहे. जो की हुकुमनाम्यासाठी महत्तवाचे तथ्य बनू शकत नाही.

११. मुळात या प्रतिवादीने नियमीत दिवाणी दावा क्र.७४/२००४ मध्ये वादी दावा मिळकतमध्ये रक्कम रू.२००/- प्रति महिणा भाडे देण्याच्या अटीवर भाडेकरू म्हणून राहत होती हे तथ्य कबूल केले असल्याचे त्या न्यायनिर्णयामध्ये स्पष्ट नमूद केले आहे. त्यामुळे वादी ही दावा मिळकतमध्ये कुळ होती हे तथ्य अलाहिदा यापुर्वी दिवाणी दावा क्र.७४/२००४ मध्ये वादीने शाबीत केले आहे. नियमीत दिवाणी दावा क्र.७४/२००४ व ६५/२०११ मधील दोन्ही न्याय निर्णय अंतिम असून त्याविरूध्द प्रतिवादीने दाखल केलेले अर्ज नामंजूर झाले आहेत. हुकुमनामा अंमलबजावणी कोर्टाने हुकुमनाम्याच्या बाहेर जाउन कोणताही आदेश करू नये असा कायदा आहे. प्रतिवादीने या प्रकरणात दाखल केलेला अर्ज हा या अर्जातील हुकुमनाम्याच्या विरोधात नसल्याने तो नामंजूर होण्यास पात्र आहे.

१२. प्रतिवादीने या प्रकरणात दाखल केलेल्या न्यायनिर्णयांपैकी 1973 AIR 139 Bombay मध्ये माननीय उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी अर्जदाराने अंमलबजावणी अर्जात हुकुमनामा हा चुकुन किंवा फसवणुक करून घेतला असल्याचे व तो वादी प्रतिवादीच्या मुळ हक्कावर किंवा हुकुमनाम्यावर प्रश्न निर्माण करत असल्याचे स्पष्ट झाल्यास त्याबाबतचा पुरावा दाखल करण्याची परवानगी देता येईल असे नमूद केले. तसेच 2015 (2) CIVCC 798 मधील न्यायनिर्णयात मा. अलाहाबाद उच्च न्यायालय यांनी भारतीय पुरावा कायदा कलम ४४ नुसार, “एखादा आदेश संमतीने किंवा फसवणुक करून मिळवला असल्यास तो अंमलबजावणीस पात्र नसल्याचे तसेच तो तसा मिळवला गेला आहे हे शाबीत करण्याची संधी अर्जदाराला देता येईल,” असे नमूद केले.

१३. मा. सर्वोच्च न्यायालय यांचेकडील 2022 Live Law (SC) 806 मधील

न्यायनिर्णयात, “एखादा न्यायनिर्णय न्यायालयाची फसवणुक करून मिळवला असल्यास त्याचा प्रभाव शुन्य आहे असे मानले पाहिजे असे नमूद केले. ”

१४. मा. सर्वोच्च न्यायालय यांचेकडील 2007 (4) SCC 2021 मधील न्यायनिर्णय, “एखादा न्यायनिर्णय न्यायालयाची फसवणुक करून मिळवला असल्याचे तो न्यायनिर्णय कायदेशीर आहे असे मानता येणार नाही व तो शुन्य प्रभावाचा न्यायनिर्णय असल्याचे मानले जावे असे नमूद केले आहे.”

१५. मा. मुंबई उच्च न्यायालय यांचेकडील 2015 (6) MhLJ 208 या न्यायनिर्णयामध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ प्रमाणे दाखल केलेल्या अर्जानुसार न्यायालयाने discretionary power नुसार तो न्यायनिर्णय परत बदलवता येईल किंवा तो रद्द करता येईल. तसेच न्यायालयाची फसवणुक करून तो न्यायनिर्णय घेतला असल्यास तो रद्दबातल करता येईल असे नमूद केले आहे.

१६. प्रतिवादीतर्फे निशाणी ४१ कडे 1994 (5) SCC 547 या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा आधार घेउन मुळ मालकाच्या विरोधात मनाईची दाद देता येणार नाही असे कथन केले. तसेच 2010 (7) SCC 417 मधील न्यायनिर्णयाचा आधार घेउन आवश्यक ते पक्षकार दाव्यात समाविष्ट केले नसल्यास दावा रद्दबातल करता येईल असे कथन केले आहे.

१७. 2011 (14) SCC 470 या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा आधार घेउन प्रतिवादीने असे कथन केले आहे की वादीने दाखल केलेला दावा हा मुळात कायदेशीर आधाराने दाखल केलेला नसलयास त्या आधारे दाखल केलेली दरखास्त पुढे चालू ठे वणे शक्य नाही म्हणून तो रद्दबातल करावा असे कथन केले आहे.

१८. वरील प्रतिवादीने दाखल केलेले सर्व न्यायनिर्णयाचे अतिशय काळजीपूर्वक अवलोकन केले. प्रतिवादीने दाखल केलेले वरील न्यायनिर्णयापैकी AIR 1973 (139), 2015 (2) CIVCC 798, 2007 (4) SCC 221, 2015 (6) MhLJ 208 या न्यायनिर्णयाचा आधार घेवून प्रतिवादीने असे नमूद केले आहे की एखादा न्यायनिर्णय किंवा

आदेश न्यायालयासोबत फसवणूक करून किंवा न्यायालयाने चुकीच्या पध्दतीने पारीत केले असल्यास किंवा तो न्यायनिर्णय अंमलबजावणीस पात्र नसल्यास तो रद्द करता येईल. मात्र या प्रकरणात मुळात वादीने प्रतिवादीच्या विरोधात नियमीत मुकदमा क्र.७४/२००४ चा दावा मनाईचा दाखल केला होता. त्या दाव्यामध्ये या प्रतिवादीच्या विरोधात त्याने वादीला कब्ज्यातून काढू नये असा मनाई आदेश दि.११.०९.२००६ रोजी पारीत करण्यात आला. या आदेशाच्या विरोधात प्रतिवादीने कोणतेही अपील दाखल केलेले नाही. त्यामध्ये वर कथन केल्याप्रमाणे या प्रतिवादीने वादीचा दावा मिळकतीमधील हक्क, म्हणजे ती दावा मिळकतीमध्ये कुळ असल्याबाबत स्पष्ट कबूल केले. याउपर प्रस्तुतची दरखास्त ज्या हुकुमनाम्याप्रमाणे दाखल केली आहे तो आदेश व हुकुमनामा वादीने माननीय जिल्हा न्यायालय नागपूर व माननीय उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्याकडे दाखल केलेल्या प्रकरणात नियमित दिवाणी दावा क्र.६५/२०११ मधील पारीत झालेला हुकुमनामा व आदेश न्यायालयासोबत फसवणुक करून किंवा महत्त्वाची गोष्ट लपवून प्राप्त केला असल्याचे कोणतेही कथन केलेले नाही. उलट माननीय उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूरयांच्याकडे दाखल केलेल्या रिट पिटीशनच्या अर्जात वादीचे विरोधात प्रतिवादीने भाडयाची रक्कम वसूलीसाठी दावा दाखल केला असल्याचे व तो दावा दि.१७.०७.२००९ रोजी रद्द झाल्याचे स्पष्ट कबूल केले आहे. अश्या परिस्थीतीमध्ये या प्रकरणातील हुकुमनामा न्यायालयाची फसवणुक करून किंवा न्यायालयापासून काही गोष्टी लपवून मिळविल्या असल्याचे दिसून येत नाही. याउलट प्रतिवादीने या अर्जाद्वारे या प्रकरणातील हुकुमनाम्याबाबत कोणतीही दाद मागितलेली नाही. मात्र त्यांनी नियमीत दिवाणी दावा क्र.७४/२००४ चा हुकुमनाम्याच्या विरोधात मागणी केली असल्याने त्या मागणीचा या प्रकरणामध्ये विचार करता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज हा केवळ सदरचे प्रकरण प्रलंबीत ठेवण्यासाठी दाखल केला असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे वर नमूद केलेले न्यायनिर्णय या प्रकरणी प्रतिवादीच्या बाजुने मदत करत नाही.

१९. प्रतिवादीने निशाणी ३५ कडील अर्ज दि.१८.०३.२०२५ रोजी दाखल केला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे या न्यायालयाने दि.२८.०२.२०२५ रोजी निशाणी ३१ वर आदेश पारीत करून कब्जा घेण्यासाठी ताबा वॉरंटचा आदेश केलेला आहे. त्याप्रमाणे दि.०७.०३.२०२५ रोजी निशाणी ३२ प्रमाणे वादीला प्रतिवादीने कब्जा दयावा यासाठी

कब्जा वॉरंट काढण्यात आले. त्याचप्रमाणे या न्यायालयाकडून निशाणी २३ प्रमाणे कब्जा वॉरंट काढण्यात आले होते. मात्र ते न बजावता दि.२१.१२.२०२२ रोजी परत आले. त्यावेळी त्या घरात असलेली प्रतिवादीची पत्नी यांनी दाराला व घराला कुलुप लावले व घराची चाबी देणार नाही, तिचे पती घरी नाही असे म्हणून कुलूप लावून घराच्या दारात येउन उभी राहिल्याने वॉरंटचे कारवाईस अडथळा निर्माण झाल्याने ताबा वादीला दिला नाही, असा अहवाल दाखल आहे. या वरून सदरचा अर्ज केवळ ताबा वॉरंट बजावला जाउ नये व प्रकरण प्रलंबित राहावे या उद्दीष्टाने दाखल केल्याचे दिसून येते. प्रतिवादीचा प्रस्तूत अर्ज दाखल करण्याचे उद्दीष्ट हा अर्ज प्रलंबित ठेवण्यासाठी असल्याचे स्पष्ट दिसून आल्याने व सदरचा अर्ज कामी मागणी केलेली बाब ही या अर्जातील हुकुमनाम्याच्या विरोधात नसल्याने प्रतिवादीने जाणुनबुजून चुकीचा अर्ज दाखल करून हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीस विलंब केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे प्रतिवादीने दाखल केलेल्या अर्जामध्ये हुकुमनाम्यास विलंब झाला असल्याचे व प्रतिवादीचे अर्जात कोणतेही तथ्य नसल्याने सदरचा अर्ज प्रतिवादीला दंड (cost) करून रद्द करणे आवश्यक व गरजेचे आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## आदेश

१) प्रतिवादीचा अर्ज (निशाणी ३५) खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादीने वादीला रक्कम रू.२,०००/- अर्जाचा खर्च म्हणून दयावा असा आदेश पारीत करतो.

३) प्रतिवादीने सदरची रक्कम वादीस न दिल्यास ती याच अंमलबजावणी अर्जात वादी वसूल करून घेण्यास पात्र आहे.

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.07.10 11:28:31 +0530

कामठी
दि.०७.०७.२०२५

(मोहन रा. कामत)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ट स्तर,
कामठी.